**L. A. BILL No. XIII OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA OFFICIAL LANGUAGES ACT, 1964.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३.**

**महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९६५ चा महा. ५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मधील,— १९६५ चा महा. ५.

(क) खंड (ब) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ब-१) "जिल्हा मराठी भाषा समिती" याचा अर्थ, कलम ५ड अन्वये प्रत्येक जिल्ह्यामध्ये घटित केलेली जिल्हा मराठी भाषा समिती, असा आहे ;";

(ख) खंड (क) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येतील :—

"(ड) "मराठी भाषा अधिकारी" याचा अर्थ, कलम ५ब च्या पोट-कलम (१) अन्वये मराठी भाषा अधिकारी म्हणून पदनिर्देशित केलेला अधिकारी, असा आहे ;

(ई) "विहित" याचा अर्थ, नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(फ) "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ग) "राज्य मराठी भाषा समिती" याचा अर्थ, कलम ५क अन्वये घटित केलेली राज्य मराठी भाषा समिती, असा आहे.".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ; आणि असा नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(२) या कलमाच्या पोट-कलम (१) खालील सर्व शासकीय प्रयोजनांमध्ये पुढील शासकीय प्रयोजनांचा समावेश असेल :—

(अ) राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांचा सर्व अंतर्गत व्यवहार किंवा कामकाज ;

(ब) राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांद्वारे राज्यातील जनतेबरोबर करावयाचे सर्व संदेशवहन व पत्रव्यवहार ;

(क) सर्व टिप्पण्या, मसुदे आणि त्यावरील सर्व शेरे, अभिप्राय व मते आणि नियमपुस्तिका, कोणतीही प्रशासकीय कार्यवाही, उपविधि, सर्व प्रकारच्या सूचना, कोणतेही प्रशासकीय काम व कामकाज, योजना, कार्यक्रम, धोरणे, निर्णय, ठराव, प्रशासकीय व इतर अहवाल, प्रसिद्धीपत्रके, निमंत्रण पत्रिका, नाममुद्रित पत्रे किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही कार्यालयाने पारित करावयाचे जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित इतर कोणतेही आदेश व दस्तऐवज ;

(ड) राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात यावयाचे सर्व प्रशासकीय व इतर अहवाल आणि शासकीय कागदपत्रे ;

(ई) राज्य शासनाने किंवा त्याच्या वतीने किंवा त्याच्या कोणत्याही विभागाने किंवा त्याच्या कार्यालयाने द्यावयाची किंवा निर्गमित करावयाची कोणतीही अनुज्ञप्ती, परवाना, प्रमाणपत्र, निविदा किंवा जाहिरात ;

(फ) राज्य शासनाच्या कार्यालयांमध्ये वापरण्यात यावयाचे सर्व प्रमाणित नमुने, प्रपत्रे किंवा नोंदवह्या किंवा जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित असणारे इतर कोणतेही दस्तऐवज ;

(ग) राज्य शासनाच्या कार्यालयांतील सर्व संकेतफलक, नामफलक, सूचना फलक आणि जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित असणाऱ्या इतर कोणत्याही प्रदर्शक बाबी ;

(ह) राज्य शासनाच्या कार्यालयांमध्ये वापरण्यात येणारे सर्व शिक्के व मोहोरा ;

(आय) राज्य शासनाच्या कोणत्याही कार्यालयाने आंतरजालामार्फत पुरवावयाचे इतर कोणतेही दस्तऐवज किंवा सेवा आणि संकेतस्थळ, उपयोजके, संकेतस्थळद्वार (पोर्टल) यांमार्फत व संदेशवहनाच्या अन्य कोणत्याही वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) मार्गाने करावयाचे जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित असणारे कोणतेही संदेशवहन ; आणि

(जे) विहित करण्यात येतील अशी इतर कोणतीही शासकीय प्रयोजने.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ यात नवीन कलमे ५अ, ५ब, ५क, ५ड, ५ई, ५फ, ५ग, ५ह व ५आय समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी धोरणांमध्ये तरतुदी करणे.

"**५अ.** या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, प्रत्येक मंत्रालयीन विभागाच्या दुय्यम आणि प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांसह राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय, जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित त्यांच्या धोरणांमध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासाठी यथोचित तरतुदी करील.

मराठी भाषा अधिकारी पदनिर्देशित करणे.

**५ब.** (१) राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय, या अधिनियमान्वये त्याला नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी, सुयोग्य अधिकाऱ्यास "मराठी भाषा अधिकारी" म्हणून पदनिर्देशित करील.

(२) मराठी भाषा अधिकारी पुढील कार्ये पार पाडील :—

(अ) कार्यालयामध्ये शासकीय प्रयोजनांसाठी मराठीचा वापर करत नसल्यासंबंधीची व या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी होत नसल्यासंबंधीची गाऱ्हाणी किंवा तक्रारी स्वीकारणे व त्यांचे प्रभावी निवारण करण्यासाठी सहाय्य करणे ; आणि

(ब) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीची सुनिश्चिती करण्यासाठी उपाययोजना करणे.

(३) कार्यालय प्रमुख आणि कार्यालयातील अन्य कोणताही अधिकारी व कर्मचारी, या अधिनियमान्वये मराठी भाषा अधिकाऱ्यास नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक ते सहाय्य करतील.

राज्य मराठी भाषा समिती घटित करणे.

**५क.** (१) या अधिनियमान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी एक राज्य मराठी भाषा समिती असेल.

(२) राज्य मराठी भाषा समितीमध्ये, पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :—

| | | |
|---|---|---|
| (एक) | मंत्री, मराठी भाषा | अध्यक्ष ; |
| (दोन) | राज्यमंत्री, मराठी भाषा | उपाध्यक्ष ; |
| (तीन) | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | उपाध्यक्ष ; |
| (चार) | अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | सदस्य ; |
| (पाच) | सचिव, मराठी भाषा विभाग | सदस्य ; |
| (सहा) | सचिव, शालेय शिक्षण विभाग | सदस्य ; |
| (सात) | सचिव, नगर विकास विभाग | सदस्य ; |
| (आठ) | सचिव, महसूल विभाग | सदस्य ; |
| (नऊ) | उपसचिव, मराठी भाषा विभाग | सदस्य-सचिव. |

(३) राज्य मराठी भाषा समितीला, योग्य वाटेल अशा विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना वेळोवेळी, बैठकीसाठी आमंत्रित करता येईल.

(४) राज्य मराठी भाषा समिती, वर्षातून किमान एकदा बैठक घेईल.

(५) राज्य मराठी भाषा समिती, पुढील अधिकारांचा वापर करील व पुढील कार्ये पार पाडील :—

(एक) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याची सुनिश्चिती करणे व त्याचा आढावा घेणे ;

(दोन) जिल्हा मराठी भाषा समितीने, या अधिनियमान्वये तिची कार्ये पार पाडताना, केलेल्या कारवाईबाबत सादर केलेल्या शिफारशींसह वार्षिक अहवालावर विचार करणे आणि या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तिला योग्य वाटतील असे निदेश जिल्हा मराठी भाषा समितीला देणे ;

(तीन) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, तिला योग्य वाटतील असे निदेश, राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांना आणि जिल्हा मराठी भाषा समितीला देणे ;

(चार) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असतील अशी प्रोत्साहके, बक्षिसे किंवा योजना यांची शिफारस करणे.

जिल्हा मराठी भाषा समिती घटित करणे.

**५ड.** (१) प्रत्येक जिल्हाधिकारी, या अधिनियमान्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि नेमून देण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी जिल्ह्यात, एक जिल्हा मराठी भाषा समिती घटित करील.

(२) जिल्हा मराठी भाषा समितीमध्ये पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :—

| | | |
|---|---|---|
| (एक) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष ; |
| (दोन) | महानगरपालिका आयुक्त | सदस्य ; |
| (तीन) | पोलीस अधीक्षक | सदस्य ; |
| (चार) | मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) | सदस्य ; |
| (पाच) | जिल्हा शिक्षणाधिकारी | सदस्य ; |
| (सहा) | मराठी भाषा, कला, प्रयोगनिष्ठ कला, साहित्य, संस्कृती किंवा प्रकाशने या क्षेत्रातील जिल्ह्यात राहणाऱ्या व्यक्तींमधून, जिल्हाधिकाऱ्याने नामनिर्देशित करावयाचे दोन प्रतिनिधी | सदस्य ; |
| (सात) | मराठी भाषा, कला, प्रयोगनिष्ठ कला, साहित्य, संस्कृती, प्रकाशने किंवा ग्रंथालये या क्षेत्रातील जिल्ह्यात काम करणाऱ्या अशासकीय संस्था, संघटना, चळवळी किवा मंच यांतील, जिल्हाधिकाऱ्याने नामनिर्देशित करावयाचे दोन प्रतिनिधी | सदस्य ; |
| (आठ) | जिल्हाधिकारी कार्यालयात पदनिर्देशित केलेला मराठी भाषा अधिकारी | सदस्य-सचिव. |

(३) वरील खंड (सहा) व (सात) मध्ये निर्दिष्ट केलेले अशासकीय सदस्य, जिल्हाधिकारी आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा कालावधीसाठी पद धारण करतील.

(४) जिल्हा मराठी भाषा समिती, तीन महिन्यातून किमान एकदा बैठक घेईल.

**जिल्हा मराठी भाषा समितीचे अधिकार व कार्ये.**

**५ई.** (१) जिल्हा मराठी भाषा समिती, पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कार्ये पार पाडील :—

(अ) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांना निदेश देणे ;

(ब) शासकीय प्रयोजनांसाठी, किंवा या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी मराठीचा वापर होत नसल्यासंबंधीच्या गाऱ्हाण्यांची किंवा तक्रारींची चौकशी करणे व त्याचे निवारण करणे ;

(क) जिल्ह्यातील राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांमधून या अधिनियमाखालील तक्रारींशी किंवा गाऱ्हाण्यांशी संबंधित आवश्यक माहिती, अभिलेख व अहवाल मागविणे व प्राप्त करणे ;

(ड) या अधिनियमाच्या अंमलबजावणीसंबंधीच्या तक्रारींची किंवा गाऱ्हाण्यांची चौकशी करणे व त्यांचे निवारण करणे आणि त्या शीघ्रगतीने निकालात काढणे ;

(ई) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे दिसून आले तर, या अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन करण्यासाठी राज्य शासनाच्या संबंधित कार्यालयास निदेश देणे ;

(फ) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, राज्य शासन, वेळोवेळी निदेश देईल अशा विविध कार्यक्रमांचे, प्रकल्पांचे, उपक्रमांचे, कार्यशाळांचे, प्रदर्शनांचे किंवा चर्चासत्रांचे आयोजन करणे ;

(ग) या अधिनिमयाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, या अधिनियमाअन्वये तिची कार्ये पार पाडताना, तिने केलेल्या कारवाईबाबतचा वार्षिक अहवाल, शिफारशींसह, राज्य मराठी भाषा समितीला सादर करणे ;

(ह) विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे आणि अशी इतर कार्ये पार पाडणे.

(२) राज्य शासनाची कार्यालये, जिल्हा मराठी भाषा समितीच्या निदेशांचे, ते प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत, अनुपालन करतील व जिल्हा मराठी भाषा समितीला अनुपालन अहवाल पाठवतील.

**मराठी भाषेच्या वापराबाबत स्वयंप्रेरणेने प्रकटीकरण.**

**५फ.** राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय, या अधिनियमाखालील आणि त्याखाली केलेल्या नियमांखालील वर्जित प्रयोजनांव्यतिरिक्त, सर्व शासकीय प्रयोजनांमध्ये मराठी भाषेचा वापर केला जात आहे असे, त्याच्या संकेतस्थळावर किंवा इतर कोणत्याही वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) साधनावर किंवा जनतेला सहज साध्य होईल अशा संदेशवहनाच्या इतर कोणत्याही साधनावर, स्वयंप्रेरणेने प्रसिद्ध करील.

**अंमलबजावणी व अनुपालन करण्याची जबाबदारी.**

**५ग.** राज्य शासनाच्या विभागाचा प्रशासकीय प्रमुख किंवा विभाग प्रमुख किंवा कार्यालयाचा कार्यालय प्रमुख किंवा कार्यालयाचा नियंत्रण अधिकारी,—

(अ) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ;

(ब) जिल्हा मराठी भाषा समितीने, राज्य मराठी भाषा समितीने व राज्य शासनाने, वेळोवेळी दिलेल्या सर्व निदेशांच्या व अनुदेशांच्या अनुपालनासाठी ;

(क) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, सर्व आवश्यक सुविधा व सेवा पुरविण्यासाठी,

जबाबदार असेल.

निदेश देण्याचा शासनाचा अधिकार.

**५ह.** राज्य शासनास, या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, आवश्यक असतील असे निदेश किंवा अनुदेश, राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांना देता येतील.

शिक्षा.

**५आय.** शिस्तभंगविषयक प्राधिकारी, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करत नसल्याबाबतची तक्रार किंवा गाऱ्हाणे प्राप्त झाल्यावर, आवश्यक असल्याचे दिसून आल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ याअन्वये किंवा त्याला लागू असलेल्या अन्य कोणत्याही सेवा नियमांन्वये किंवा विनियमांन्वये संबंधित शासकीय कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करील. शिस्तभंगविषयक प्राधिकारी, त्याने केलेल्या अशा शिस्तभंगाच्या कारवाईसंबंधातील अहवाल राज्य मराठी भाषा समितीला व जिल्हा मराठी भाषा समितीला सादर करील.”.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ (१९६५ चा महा. ५) याच्या कलम १अ मध्ये, महाराष्ट्र राज्याची राजभाषा मराठी असेल, अशी तरतूद आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, मराठी ही, राज्य शासन, **राजपत्रात** वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांद्वारे निर्दिष्ट करील अशा प्रयोजनांव्यतिरिक्त भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४५ मध्ये उल्लेख केलेल्या सर्व शासकीय प्रयोजनांकरिता महाराष्ट्र राज्याच्या संबंधात उपयोगात आणावयाची भाषा असेल, अशी तरतूद आहे.प्रशासकीय सोयीसाठी उक्त कलम ४ च्या तरतुदी स्पष्ट करण्याकरिता, राज्याच्या ज्या शासकीय प्रयोजनांमध्ये मराठी भाषेचा वापर केला जात आहे अशा शासकीय प्रयोजनांमध्ये अंतर्भूत असलेल्या शासकीय प्रयोजनांचे विविध प्रकार विनिर्दिष्ट करणे शासनास इष्ट वाटते. उक्त अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, त्या प्रयोजनांसाठी, यथोचितरीत्या सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीचे संनियंत्रण करण्यासाठी शासनास, राज्य मराठी भाषा समिती व जिल्हा मराठी भाषा समित्या घटित करणे आवश्यक वाटते आणि प्रत्येक कार्यालयात मराठी भाषा अधिकारीदेखील पदनिर्देशित करणे आवश्यक वाटते. उक्त अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उक्त अधिनियमात इतर विवक्षित सुधारणादेखील प्रस्तावित केल्या आहेत.

**३.** उक्त अधिनियमातील प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) राज्यात, ज्या शासकीय प्रयोजनांमध्ये मराठी भाषेचा वापर केला जात आहे त्या शासकीय प्रयोजनांचे विविध प्रकार विनिर्दिष्ट करणे ;

(दोन) उक्त अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे याचा आढावा घेऊन त्याची सुनिश्चिती करण्यासाठी राज्य मराठी भाषा समिती घटित करणे आणि राज्य शासनाची सर्व कार्यालये व जिल्हा मराठी भाषा समित्या इत्यादींना निदेश देणे, इत्यादि ;

(तीन) उक्त अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील राज्य शासनांच्या सर्व कार्यालयांना निदेश देणे, त्यासंबंधातील गाऱ्हाणी दूर करणे आणि मराठी भाषेच्या प्रसारासाठी कार्यशाळा, प्रदर्शने, चर्चासत्रे, इत्यादींसारखे विविध उपक्रम आयोजित करणे ;

(चार) राज्य शासनाची सर्व कार्यालये, जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित त्याच्या धोरणांमध्ये, मराठी भाषेच्या वापरासाठी यथोचित तरतुदी करतील, अशी तरतूद करणे ;

(पाच) राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय, वर्जित प्रयोजनांव्यतिरिक्त सर्व शासकीय प्रयोजनांमध्ये मराठी भाषेचा वापर केला जात आहे असे स्वयंप्रेरणेने प्रकटीकरण करील, अशी तरतूद करणे ;

(सहा) प्रशासकीय प्रमुख किंवा विभाग प्रमुख किंवा कार्यालय प्रमुख किंवा कार्यालयाचा नियंत्रण अधिकारी उक्त अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जबाबदार असेल, अशी तरतूद करणे ;

(सात) राज्य शासनास, या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असतील असे निदेश किंवा अनुदेश, राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांना देता येतील, अशी तरतूद करणे ;

(आठ) उक्त अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करत नसल्याबाबत शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी तरतूद करणे.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **सुभाष देसाई,**

दिनांक ४ जुलै, २०२१. मराठी भाषा मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड ३.—**महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ (१९६५ चा महा. ५) याच्या कलम ४ मध्ये सुधारणा करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये, महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत, ज्या शासकीय प्रयोजनांमध्ये मराठी ही राजभाषा म्हणून वापरण्यात येईल, अशी इतर शासकीय प्रयोजने नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४.—**उक्त अधिनियमामध्ये नवीन कलमे ५अ ते ५आय समाविष्ट करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये,—

(क) नवीन कलम ५ड मध्ये, जिल्हा मराठी भाषा समितीच्या अशासकीय सदस्यांचा पदावधी आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्याचा अधिकार, जिल्हाधिकाऱ्यांकडे घेण्यात आला आहे ;

(ख) नवीन कलम ५ई मध्ये, जिल्हा मराठी भाषा समितीचे असे इतर अधिकार व कार्ये नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे उपरोल्लिखित प्रस्ताव सामान्य स्वरूपाचे आहेत.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३.]**

**[महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. सुभाष देसाई,**
मराठी भाषा मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई